# ॥ करुणात्रिपदी ॥

## ॥ पद १ ॥

शांत हो श्रीगुरुदत्ता मम चित्ता शमवी आतां॥धृ॥ तूं केवळ माता जनिता, सर्वथा तूं हितकर्ता॥ तूं आप्त स्वजन भ्राता, सर्वथा तूंची त्राता॥ चाल॥ भयकर्ता तूं भयहर्ता॥ दंडधर्ता तूं परिपाता॥ तुजवांचुनी न दुजी वार्ता॥ तूं आर्ता आश्रय दत्ता॥ ॥ शांत.॥ १॥ अपराधास्तव गुरु नाथा, जरी दंडा धरिसी यथार्था॥ तरी आम्हीं गाउनी गाथा, तव चरणी नमवूं माथा॥ चाल॥ तूं तथापि दंडिसी देवा॥ कोणाचा मग करूं धावा॥ सोडविता दुसरा तेव्हां॥ कोण दत्ता आम्हां त्राता॥ शांत.॥ २॥ तूं नटसा होउनी कोपी, दंडितांही आम्ही पापी॥ पुनरपिही चुकता तथापि, आम्हांवरी न च संतापी॥ चाल॥ गच्छतः स्खलनं क्वापि॥ असें मानुनी नच हो कोपी॥ निजकृपालेशा ओपी॥ आम्हांवरी तूं भगवंता॥ शांत.॥ ३॥ तव पदरी असतां ताता, आडमार्गी पाऊल पडतां॥ सांभाळुनी मार्गावरता, आणिता न दुजा त्राता॥चाल॥ निज बिरूदा आणुनी चित्ता॥ तूं पतितपावन दत्ता॥ वळे आतां आम्हांवरता॥ करुणाघन तूं गुरुनाथा॥ शांत.॥ ४॥ सहकुटुंब सहपरिवार, दास आम्ही हें घरदार॥ तव पदीं अर्पु असार, संसाराहित हा भार॥ चाल.॥ परिहरिसी करुणासिंधो॥ तूं दीनानाथ सुबंधो॥ आम्हां अघलेश न बाधो॥ वासुदेव प्रार्थित दत्ता॥ शांत हो श्रीगुरुदत्ता॥ मम चित्ता शमवी आतां॥ ५॥